-: प्रेसनोट दिनांक - ०९/०३/२०२६ :-

आरोपी लोकसेवक ०1) इजाज महंमद शेख, पोलीस शिपाई ब.नं.१५४१ नेमणुक गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे, रा.करनुर, ता.कागल, जि.कोल्हापूर ०२) नितेश मारूती कांबळे, पोलीस हेड कॉन्स्टेबल, ब.नं. १७४८, नेमणुक गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे ठाणे, रा. द-याचे वडगाव, ता. करवीर, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अ, १२ प्रमाणे फिर्याद आहे यांनी लाच मागणी केलेबाबत....

---

यातील मुळ तक्रारदार यांचे विरूध्द गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे अर्ज प्राप्त झाला होता. सदर अर्जाच्या चौकशीमध्ये तक्रारदार यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्याकरीता गोकुळ शिरगाव पोलीस ठाणेच्या सहा.पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम व पो.हे.कॉ. नितेश कांबळे यांनी तक्रारदार यांच्याकडे ७,००,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे दिलेली होती.

मुळ तक्रारदार यांचेविरूध्द गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे अर्जाच्या चौकशीमध्ये तक्रारदार यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्याकरीता गोकुळ शिरगाव पोलीस ठाणेच्या प्रभारी यांचे नाव सांगुन त्यांच्याकरीता पोलीस एजाज शेख यांनी तक्रारदारांकडे बेकायदेशिरपणे ७,००,०००/-रु लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४,००,०००/-रू लाचेची मागणी करून लाच रक्कम पुढील दोन दिवसात घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. तसेच मुळ तक्रारदार यांचे काम पोलीस कांबळे यांचेशी संबधीत असल्याने ते पोलीस एजाज शेख यांनी तक्रारदार यांच्याकडे लाच मागणी करीत असताना तेथे समक्ष उपस्थित राहुन पो.हे.कॉ.कांबळे हे लाच मागणीस बेकायदेशिरपणे प्रोत्साहन देत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरबाबत आरोपी ०1) एजाज महंमद शेख, पोलीस शिपाई ब.नं.१५४१ नेमणुक गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे, रा.करनुर, ता.कागल, जि.कोल्हापूर ०२) नितेश मारूती कांबळे, पोलीस हेड कॉन्स्टेबल, ब.नं. १७४८, नेमणुक गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे ठाणे, रा. द-याचे वडगाव, ता. करवीर, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेत आला आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे,यांचे मार्गदर्शनानुसार राजेंद्र सानप, पोलीस निरीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उज्वला भडकमकर यांनी व अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील अमंलदार यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :-
०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९४०४३२१०६४, ९७६४१४०७७७.

४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

५) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४

६) व्हॉटस अप कमांक :- .९४०४३२१०६४.